महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा

शुक्रवार ◆५ सप्टेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक०७४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

## कल्याण डोंबिवलीत मंगळवारी पाणी नाही

### कधी आणि कुठे?

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या मोहिली जलशुद्धीकरण केंद्र येथे देखभाल दुरुस्तीचे काम करण्यात येणार असल्याने मंगळवारी कल्याण डोंबिवली शहराचा पाणी पुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे. सकाळी १० ते सायंकाळी ४ या वेळेत या दोन्ही शहरांचा पाणी पुरवठा बंद राहणार असल्याची माहिती पालिकेने दिली आहे.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या १५० द.ल.ली मोहिली उदंचन केंद्र (नेतिवली जलशुद्धीकरण केंद्र) व १०० द.ल.ली. मोहिली जलशुद्धीकरण केंद्राला महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मार्फत टाटा पॉवर कांबा सबस्टेशन येथून विद्युत पुरवठा केला जातो. टाटा पॉवर कांबा सबस्टेशन मधील एनआरसी २ फीडरच्या देखभाल दुरुस्तीचे काम मंगळवारी केले जाणार आहे. यासाठी सकाळी १० ते सायंकाळी ४ या वेळेत शट डाऊन घेण्यात येणार आहे.

या दिवशी वीज पुरवठा बंद राहणार असल्याने मोहिली व नेतिवली जलशुद्धीकरण केंद्रातून पाणी पुरवठा होणार नसल्याने मोहने उदंचन केंद्र, बारावे जल शुद्धीकरण केंद्र येथील विद्युत व यांत्रिकी उपकरणांची देखभाल दुरुस्ती करण्यात येणार आहे. या कामामुळे पालिकेच्या बारावे, मोहिली व नेतीवली जलशुद्धीकरण केंद्रातून कल्याण, डोंबिवली, कल्याण ग्रामीण, मांडा टिटवाळा, आंबिवली, शहाड, अटाळी या भागास पाणी पुरवठा बंद राहणार आहे.

गणेशोत्सवात धारावीत बत्ती गुल

धारावीत गणेशोत्सवाची धूम चालू आहे. मात्र, गेली काही दिवसांपासून धारावीतील संत कक्कया मार्गावरील दगडी बिल्डिंग, कवडे चाळ, शास्त्री नगर, ढोर वाडा आदी विभागात अचानक वीज बंद होण्याचे प्रकार घडत आहेत. गणेशोत्सव मंडळांमध्ये विविध कार्यक्रम घेतले जात आहेत. यात वीज जाण्याचा प्रकार होत असल्याने मंडळे, भाविक व स्थानिक रहिवासी संताप व्यक्त करत आहेत. धारावीत 'बेस्ट' प्रशासन विजेचा पुरवठा करत आहे.

दरदिवशी धारावीत विविध वस्त्यांमध्ये अचानक वीज जाते यामुळे संगणक, टीव्ही आदी विजेची उपकरणे बंद पडत आहेत. यामुळे स्थानिकांना आर्थिक भुर्दंडसोसावा लागत आहे. याचा फटका स्थानिक लघु उद्योग, घरगुती व्यवसायावर याचे दुष्परिणाम होत आहेत. यावर 'बेस्ट' प्रशासनाने कायमचा तोडगा काढण्याची मागणी होत आहे.

## मराठा आरक्षण जीआरविरोधात
# भटक्या-विमुक्त जमाती संघटना आक्रमक

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



मुंबई : महाराष्ट्र सरकारने हैदराबाद खंडपीठाच्या आदेशानुसार मराठा समाजातील लोकांना कुणबी प्रमाणपत्र देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयावर भटक्या-विमुक्त जमाती संघटना, महाराष्ट्र यांनी तीव्र आक्षेप घेतला आहे. मुंबईत घेतलेल्या पत्रकार परिषदेत संघटनेचे अध्यक्ष उपकार लक्ष्मण माने यांनी सरकारवर अन्यायाचा ठपका ठेवत राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

यावेळी बोलताना उपकार लक्ष्मण माने म्हणाले की, १९६१ मध्ये आमचा भटक्या-विमुक्त समाज स्वतंत्र सूचीत समाविष्ट असूनदेखील आजतागायत न्याय मिळालेला नाही. पण मोठ्या समाजांना मात्र आरक्षणाच्या याद्यांमध्ये समाविष्ट करून सरकार आमच्यावर अन्याय करत आहे. हा निर्णय अन्यायकारक आणि भटक्या जमातींच्या हक्कांवर घाला घालणारा आहे.

त्यांनी पुढे सांगितले की, मोठ्या जातींना प्राधान्य देत असताना आम्हाला सतत डावलले जात आहे. आरक्षणाच्या लढ्यात भटक्या-विमुक्तांचा प्रश्न नेहमीच मागे ढकलला जातो. सरकारने त्वरित या निर्णयावर पुनर्विचार करावा, अन्यथा लढा अधिक तीव्र होईल. याचबरोबर संघटनेने स्पष्ट इशारा दिला की, १० सप्टेंबरपासून भटक्या-विमुक्त जमातीचे हजारो लोक राज्यभर उपोषण सुरू करणार आहेत.

> सरकारने दुर्लक्ष केल्यास आंदोलन रस्त्यावर उतरेल. भटक्या जमातींना न्याय मिळेपर्यंत हा लढा सुरू राहील
> – उपकार लक्ष्मण माने

सरकारने दुर्लक्ष केल्यास आंदोलन रस्त्यावर उतरेल. भटक्या जमातींना न्याय मिळेपर्यंत हा लढा सुरू राहील, असं त्यांनी सांगितले आहे. आजही भटक्या जमातींना मूलभूत हक्क मिळत नाहीत. शिक्षण, नोकरी, आरक्षण यामध्ये मुलांना न्याय नाही. मोठ्या समाजांच्या मागण्यांवर सरकार तत्परतेने निर्णय घेतं, मात्र आमच्याकडे दुर्लक्ष होतं. हा अन्याय आम्ही सहन करणार नाही, असं वक्तव्य समाजाकडून करण्यात येत आहे.

# आव्हाडांना भाजपचा धक्का

## माजी नगरसेवक अमित सरय्या भाजपात

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : शरद पवार यांच्या राष्ट्रवादीमधील माजी नगरसेवकांचा शिंदेच्या शिवसेनेत प्रवेश करून शिवसेनेने जितेंद्र आव्हाडांना कळव्यात मोठा धक्का दिला होता. आता जितेंद्र आव्हाड यांचे कट्टर समर्थक असलेले माजी नगरसेवक अमित सरय्या यांनी देखील गुरुवारी मुंबईत प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, आमदार संजय केळकर आणि आमदार निरंजन डावखरे यांच्या उपस्थितीत भाजपमध्ये प्रवेश केला. या प्रवेशामुळे भाजपने जितेंद्र आव्हाड यांना मोठा धक्का दिलाच मात्र उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या मतदार संघातही मोठी खेळी खेळली असल्याची आता राजकीय वर्तुळात चर्चा सुरु झाली आहे.

महापालिका निवडणुकांच्या तारखा अजून निश्चित झाल्या नसल्या तरी, सर्वच प्रमुख राजकीय पक्ष कामाला लागले आहेत. खाडीच्या पलिकडे असलेल्या कळवा परिसरात भाजपने शरद पवार यांच्या राष्ट्रवादीच्या नगरसेवकांना गळाला लावण्याचा प्रयन्त केला होता. मात्र शिंदेच्या शिवसेनेने भाजपची ही खेळी यशस्वी होऊन दिली नव्हती. राष्ट्रवादीच्या नगरसेवकांनी शिवसेनेत प्रवेश केला होता. आता मात्र उपमुख्यमंत्री शिंदेच्याच मतदार संघात भाजपने राजकीय खेळी केली असून जितेंद्र आव्हाड यांचे कट्टर समर्थक आणि माजी नगरसेवक अमित सरय्या यांचा भाजपमध्ये प्रवेश करून घेतला असून यानिमित्ताने भाजपने जितेंद्र आव्हाड यांना मोठा धक्का दिलाच मात्र शिंदेच्या शिवसेने समोरही नवे आव्हान उभे केले आहे.



ठाणे महापालिकेवर सत्ता मिळवण्यासाठी भाजप आणि शिंदेच्या शिवसेनेत रस्सीखेच सुरु आहे. त्यामुळे इतर पक्षातील मोठे मासे आपल्या गळाला लावण्याचे शिवसेना आणि भाजपचे प्रयत्न सुरु आहेत. एकीकडे शिंदे ताकद लावत असताना भाजप पण मैदानात उतरली आहे. एकनाथ शिंदेच्या मतदारसंघांत भाजपची ताकत वाढवण्यासाठी भाजपचे कसून प्रयत्न सुरु असून हा प्रवेश त्याची सुरुवात मानली जात असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

फेसबुक प्रकरणानंतर सरय्या यांच्या समर्थकांमध्ये अस्वस्थता..

भाजपचे दिवंगत नगरसेवक विलास कांबळे यांच्या फेसबुक अकाऊंटवरून शिवसेनेच्या माजी नगरसेवकाच्या संदर्भात वादग्रस्त पोस्ट टाकण्यात येत होत्या. या प्रकरणात एकाला पोलिसांनी ताब्यातही घेतले होते. या प्रकरणाची निपक्षपणे चौकशी व्हावी यासाठी पोलीस स्टेशनला गेलेल्या अमित सरय्या यांना शिवसैनिकांकडून धक्काबुक्की झाली होती. त्यानंतर त्यांच्या समर्थकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली होती. त्यानंतरला लगेचच हा पक्षप्रवेश झाला आहे.

## डोंबिवलीत भूमाफियांनी तलाठी कार्यालय फोडले

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : एकीकडे डोंबिवलीत जमिनीचे भाव गगनाला भिडले असतानाच पु. भा. भावे सभागृहातील तलाठी कार्यालय भूमाफियांनी फोडल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली आहे. चोरट्यांनी कागदपत्रे पळवण्याचा प्रयत्न केला. तसेच पोबारा करताना नवे टाळे ठोकले. पोलिसांनी या माफियांचा शोध सुरू केला असून अद्याप कुणालाही अटक करण्यात आलेली नाही. या चोरीप्रकरणी विष्णूनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# जिल्हा परिषदेच्या पुढाकारामुळे शिक्षण क्षेत्र गतिमान

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : शिक्षक हे खरे कर्मयोगी आहेत. विद्यार्थ्यांना ज्ञानाबरोबर संस्कार देण्याचे कार्य शिक्षक करतात, हे लाख मोलाचे आहे. जिल्हा परिषदेच्या पुढाकारामुळे शिक्षण क्षेत्र गतिमान झाले असल्याचे मत आमदार निरंजन डावखरे यांनी व्यक्त केले.

शिक्षकदिनाच्या औचित्याने जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजित 'जिल्हा आदर्श शिक्षक गुणगौरव पुरस्कार २०२५-२६' वितरण सोहळा ठाणे येथील बी. जे. हायस्कूल सभागृहात पार पडला. यावेळी सहा शिक्षकांना जिल्हास्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी बोलताना त्यांनी हे मत व्यक्त केले.



डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, मुख्यकार्यकारी अधिकरी रोहन घुगे, शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे आदी उपस्थित होते. यावेळी ग्रामीण भागातील शिक्षण, आरोग्य व कृषी क्षेत्राला तंत्रज्ञानाची जोड देत जिल्हा परिषदेचे कामकाज उत्तम सुरू आहे.

आयुष्यभराच्या कर्तृत्वाचे फलित म्हणून आज शिक्षकांना हा सन्मान मिळत आहे, ही गौरवास्पद बाब असल्याचे मत आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी पुरस्कारप्राप्त शिक्षकांचे अभिनंदन करताना व्यक्त केले. तर, मुख्यकार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी, जिल्हा परिषद शिक्षकांच्या प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे.

दिशा प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यातील निपुण महाराष्ट्र संकल्पना साकार होत असून, जिल्ह्यातील ३२ लाख विद्यार्थ्यांच्या चाचण्या घेण्यात आल्या आहेत. यामुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती तपासता येते. शिक्षकांच्या बदली, पदोन्नती व विविध प्रश्न सोडविण्यासाठी देखील प्रशासन वचनबद्ध आहे. शाळांमध्ये भौतिक सुविधा, सौर ऊर्जा, डिजिटल शिक्षण व दुरुस्ती यासाठी पुढाकार घेतला जात आहे.

शिक्षकांना समृद्ध केल्याशिवाय विद्यार्थी सक्षम होणार नाहीत, त्यामुळे शिक्षकांचे योगदानच ठाणे जिल्ह्याच्या शैक्षणिक प्रगतीचे खरे बळ आहे.' असे मार्गदर्शन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले. प्रास्ताविक करताना बाळासाहेब राक्षे यांनी शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणात शिक्षकांचे योगदान अधोरेखित केले.

> **विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षक म्हणून देश घडविण्यात आम्हाला सन्मानाने योगदान देता येत आहे. आजचा सन्मान म्हणजे शिक्षकांना मिळालेली कौतुकाची थाप आहे.'**
> – वर्षा भानुशाली, पुरस्कारप्राप्त शिक्षिका.

**जिल्हा आदर्श शिक्षक गुणगौरव पुरस्कार प्राप्त शिक्षकांची नावे**

**सन २०२५-२६ वर्षातील जिल्हा आदर्श शिक्षक गुणगौरव पुरस्कार प्राप्त शिक्षक अबंरनाथ तालुक्यातील शिक्षिका वर्षा भानुशाली, भिवंडी तालुक्यातील पदवीदर शिक्षिका पुष्पावती भोईर, कल्याण तालुक्यातील शिक्षक राजाराम वेखंडे, मुरबाड तालुक्यातील पदवीधर शिक्षक अविनाश सुरोशे व शिक्षक राजाराम गायकर, शहापूर तालुक्यातील शिक्षक नवनीत फर्डे**







# केडीएमसीच्या प्रभाग रचनेवर २६४ हरकती

## २६ ते ३० सप्टेंबरपर्यंत अंतिम प्रभाग जाहीर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता




कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या सन 2025 मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणूकीसाठी प्रारुप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिध्द करण्यासाठी आणि त्यावर हरकती व सुचना मागविण्यासाठी शुक्रवार दि.22 ऑगस्ट 2025 ते गुरुवार दि.04 सप्टेंबर 2025 रोजी दुपारी 03.00 वाजेपर्यंत कालावधी देण्यात आला होता. सदर कालावधीत एकुण 264 हरकती प्राप्त झाल्या अशी माहिती निवडणूक विभागाचे उपआयुक्त रमेश मिसाळ यांनी आज दिली.

सदर हरकतींवरील सुनावणी राज्य शासनाकडून नियुक्त केलेले प्राधिकृत अधिकारी मा.श्री.दिपेंद्र कुशवाह, विकास आयुक्त (उद्योग) उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन यांचे समोर मा.स्थायी समिती सभागृह, महापालिका भवन, 2रा मजला, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका मुख्यालय, कल्याण (पश्चिम) येथे गुरुवार दि. 11 सप्टेंबर 2025 रोजी सकाळी 10.00 वाजेपासून ते सायं. 05.00 या वेळेत होणार आहे.

# ‘शिक्षक’ भावी पिढीचा शिल्पकार



भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांचा 5 सप्टेंबर रोजी जन्मदिन 'शिक्षक दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. 'शिक्षक' हा भावी पिढीचा शिल्पकार असून त्यांच्याकडूनच आपल्याला ज्ञान व जगाकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी मिळत असते. आपल्या गुरू, शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस....

डॉ. राधाकृष्ण यांचे शिक्षकांप्रती असलेले प्रेम व आदर पाहून भारत सरकारने त्यांचा जन्मदिन हा 'शिक्षक दिन' म्हणून साजरा करण्याचा संकल्प केला. ती परंपरा अजूनही सुरू आहे व भविष्यातही सुरूच राहिल. 1962 मध्ये डॉ. राधाकृष्णन् यांनी राष्ट्रपती पदाची शपथ घेतली तेव्हा त्यांचा जन्मदिवस हा शिक्षकांचा गौरव दिन म्हणून साजरा करण्याची इच्छा प्रकट केली होती. देशातील शिक्षकांचा गौरव हाच आपला गौरव असल्याचे त्यांनी सांगितले होते.

डॉ. राधाकृष्णन् यांचा जन्म 5 सप्टेंबर 1888 रोजी मद्रासजवळील तिरुराणी येथे झाला. ते ब्राम्हन कुळातील असल्याने त्यांच्या घरात नेहमी धार्मिक विधी केला जात असे. त्या धार्मिक वातावरणातच ते लहानाचे मोठे झाले. वयाच्या अवघ्या 15 व्या वर्षी त्यांनी मॅट्रिक परीक्षा उत्तीर्ण केली. 'तत्त्वज्ञान' हा त्यांचा आवडता विषय असल्याने त्यांनी या विषयात पदवी घेतली. त्यानंतर त्यांनी मद्रासच्या एका महाविद्यालयात नोकरी केली. नोकरी करत असतानाही त्यांनी शिक्षण सोडले नाही. त्यांनी 'वेदांतातील नीतिशास्त्र' या विषयावर प्रबंध सादर केला. त्यांच्या प्रबंधास विद्यापीठाने सर्वोत्तम प्रबंध म्हणून जाहीर करून त्यांचा गौरव केला. एक उत्कृष्ट प्राध्यापक म्हणून त्यांनी आपल्या कार्यातून स्वत:ची साऱ्या जगाला ओळख करून दिली. कुशल व्यक्तिमत्व व इंग्रजी भाषेवर असलेल्या त्यांच्या प्रभुत्वामुळे पार परदेशात त्यांची प्रशंसा झाली. ऑक्सफर्ड विद्यापीठातही ते 'नीतिशास्त्र' या विषयाचे प्राध्यापक होते.

शिक्षकांना वैदिक काळापासूनच गुरूचे स्थान आहे. त्यांच्या ऋणातून आपण कधीच मुक्त होऊ शकत नाही. आज शिक्षणाचे अवमुल्यन केला जात असल्याचे चित्र समाजात दिवस आहे. तसेच गुरू-शिष्य संबंधांमधील पवित्र भावना लोप पावत आहे. या संबंधामधील पावित्र्य कायम ठेवण्यासाठी व डॉ. राधाकृष्णन् यांच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी शिक्षक दिन साजरा केला जातो.

शिक्षक हा समाज परिवर्तन करणारा घटक आहे. भविष्यातले विचारवंत, कलाकार, लेखक, तत्त्वज्ञ, पुढारी, डॉक्टर, प्राध्यापक, इंजिनीयर, शास्त्रज्ञ तयार करण्याचे सामर्थ्य शिक्षकांमध्ये असते. ज्या प्रमाणे मातीच्या गोळयाला कुंभार आकार देऊन त्यापासून एखादी प्रतिकृती तयार करत असतो, अगदी त्याचप्रमाणे शिक्षक बालकांच्या कोऱ्या मनावर योग्य संस्कार करून त्यातून भविष्यातील जबाबदार नागरिक घडवित असतात. आपल्या आई-वडीलांनंतर शिक्षक हे आपले अप्रत्यक्षरित्या पालकच असतात.

शिक्षक हे आपल्याला केवळ पुस्तकी ज्ञान शिकवित नाहीत तर आपण त्यांच्याकडून जगण्याची कला आत्मसात करत असतो.

आपल्या व्यक्तीमत्त्वावर त्यांच्याकडून संस्कार, संस्कृती, परंपरा, चालीरिती व आदर असे पैलू पाडले जात असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या गुरूंचा नेहमी आदरपूर्वक सन्मान केला पाहिजे. त्यांच्याविषयी शिक्षक दिनी कृतज्ञता व्यक्त करून त्याचे ऋण फेडण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

## कल्याण तालुका ओबीसी समाजाचे तहसीलदार कार्यालयासमोर उपोषण



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

टिटवाळा : ओबीसी समाजाच्या विविध मागण्या साठी कल्याण तालुका ओबीसी समाजाच्या वतीने कल्याण तहसीलदार कार्यालया समोर 4सप्टेंबर पासून साखळी उपोषण सुरू केले आहे,

ओबीसी समाजामध्ये 347 जातींचा समावेश होत असून 27 टक्के आरक्षण आहे,त्या मध्ये आता मराठा समाज घुसखोरी करीत आहे,हे चुकीचे आहे, म्हणून आमच्या मागण्या आहेत कि शासनाने काढलेला जीआर ताबडतोब रद्द करावा,मराठा समाजाला ओबीसी मधुन आरक्षण देऊ नये, मराठा समाजाला सरसकटपणे ओबीसी दाखले देवू नये, जातीनिहाय जनगणना करण्यात यावी, ओबीसी मुलांना व्यावसायिक अभ्यासक्रमात शंभर टक्के शिष्यवृत्ती देण्यात यावी, गुणवत्ता ओबीसी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी परदेशात जाण्याची शिष्यवृत्ती संख्या वाढविण्यात यावी जर मराठा समाजाने मुंबई जाम केली होती तर आम्ही दिल्ली जाम करु असे ओबीसी नेते विश्वनाथ जाधव यांनी सांगितले,

यावेळी साखळी उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी आगरी सेनेचे ठाणे जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत ठाणकर, ओबीसी नेते डॉ सुरेश कापरे,बाजार समितीचे सभापती रवींद्र घोडविंदे, संचालक वसंत लोणे,नरेश सुरोशी,रमेश बांगर,माळी समाजाचे प्रशांत माळी, शनी आबांरे,मधूकर वाळींबे, सुरेश पिंताबरे, , भगवान जाधव,देसले, अँड भोईर, परशुराम पितांबरे, जयराम मेहेर, शत्रुघ्न भोईर, यांच्या सह ओबीसी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते, तसेच रिपाइंचे आठवले गटाच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आली यावेळी रिपाइंचे जेष्ठ नेते अण्णासाहेब रोकडे, माजी नगरसेवक भिमराव डोळस, रिपाइंचे शहरं अध्यक्ष संजय जाधव उपस्थित होते.

## कल्याण पंचायत समिती कार्यालयात मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान कार्यशाळा




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत लोकचळवळ उभी करण्यासाठी जिल्हा स्तरावर कार्यशाळेचे आयोजन नुकतेच झाल्यानंतर आज कल्याण पंचायत समितीमध्ये अगदी खेळीमेळीच्या वातावरणात ही कार्यशाळा संपन्न झाली,तालुक्यातून सरपंच, उपसरपंच, कर्मचारी व ग्रामपंचायत अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी व्यासपीठावर गटविकास अधिकारी संजय भोये, सहाय्यक बीडिओ रघुनाथ गवारी, पशुसंवर्धन अधिकारी डॉ अनिल धांडे, विस्तार अधिकारी प्रशांत गजाकोश,,कृषि अधिकारी बाबासाहेब शिंदे, आणि पत्रकार संजय कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यशाळेत गटविकास अधिकारी संजय भोये यांनी उपस्थितींताना मार्गदर्शन करताना सांगितले की तालुक्यातील४६ग्रामपंचायतीच्या माध्यमातून हे अभियान राबविण्यात येणार असून तालुक्यात प्रथम येणाऱ्या ग्रामपंचायतीला १५लाख रुपये, द्वितीय१२लाख तर तृतीय क्रमांक पटकावला तर८लक्ष रुपये बक्षीस असल्याचे सांगून जिल्हा स्तरावर ५० लक्ष, विभागात१कोटी तर राज्य स्तरावर निवड झाल्यास तब्बल ५ कोटी रुपये बक्षीस मिळणार आहे, यासाठी लोकसहभाग महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यशाळेत सुशासनयुक्त पंचायत, सक्षम पंचायत, जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव, मनरेगा व इतर योजनांशी अभिसरण, संस्था सक्षमीकरण, उपजीविका विकास व सामाजिक न्याय, लोकसहभागातून लोकचळवळ, नाविन्यपूर्ण उपक्रम तसेच विविध मुद्द्यांवर सविस्तरमार्गदर्शन सुनील कोर व प्रवीण भेरे यांनी केले.. स्वनिधी निर्मिती व लोकवर्गणीद्वारे ग्रामपंचायतींचे आर्थिक सक्षमीकरण, पाणीपुरवठा, जलसंधारण व पर्यावरण संवर्धन, शेततळे व घरकुल बांधकाम योजनेशी अभिसरण, ग्रामपातळीवरील संस्थांचे सक्षमीकरण आणि महिला बचतगट, शेतकरी व दुर्बल घटकांसाठी ठोस उपाययोजना यावर विशेष भर देण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन विस्तार अधिकारी पराग भोसले यांनी मानले.

## भिवंडीमध्ये गणपती बाप्पांचे मोठ्या जल्लोषात विसर्जन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : गणपती बाप्पा मोरया अशा जय घोषांत घरगुती व सार्वजनिक गणपती बाप्पांचे आगमन झालेले असून, आज ७ दिवसांचे घरगुती, सार्वजनिक गणपती व गौरींचे विसर्जन होणार आहे. या गणेशोत्सव २०२५ च्या बाप्पांच्या आगमनापूसन ते विसर्जनापर्यंत भिवंडी महानगरपालिकेच्यावतीने पुरविल्या जाणा-या विविध सेवा सुविधा पुरविण्यासंबंधी संबंधित सर्व विभागांनी कामाचे कृती आराखड्यामार्फत नियोजन केले. असून, अधिकारी व कर्मचा-यांच्या ठिकठिकाणी नियुक्त्या करुन गणेशोत्सव कालावधीमध्ये कोणत्याही सेवा-सुविधा अपु-या पडणार नाहीत याची काळजी घेऊन भिवंडी महानगरपालिका पूर्ण तयारीनिशी सज्ज असल्याची माहिती मनपा चे प्रशासक तथा आयुक्त श्री अनमोल सागर (भा.प्र.से.) यांनी दिली आहे.

या वर्षी महानगरपालिकेने एकुण १० कृत्रीम तलाव उपलब्ध करुन दिले असून सर्व भाविकांनी त्यांच्या घरगुती गणेश मुर्तीचे विसर्जन कृत्रीम तलावांमध्ये करावे, असे आवाहन आयुक्तांनी केले.



यावेळी गणेश आगमन व विसर्जन मार्गावर प्रत्येक एक अधिका-याची तर विसर्जन घाटांवर प्रत्येक दोन समन्वय अधिकारी नियुक्ती करण्यात आली होती. या सर्व व्यवस्थेमुळे गणपती विसर्जन अत्यंत सुरळीतपणे पार पडले. नागरिकांनी देखील महानगरपालिकेच्या सुविधांवर समाधान व्यक्त करुन, कामाची पोच पावती दिली.

परंपरेनुसार गुलाल व फुले पाकळ्यांची उधळण करीत गणपती बाप्पा मोरया, पुढल्या वर्षी लवकर या !! या गणेशभक्तांच्या जयघोषाने संपूर्ण भिवंडी शहर दुमदुमत, भिवंडीकरांनी आपल्या लाडक्या विघ्नहर्त्या गणपतींचे भावपूर्ण वातावरणांत भिवंडी महानगरपालिकेच्या नदिनाका-टिळक घाट, व-हाळादेवी येथील व-हाळदेवी, कामतघर, फेणे हे विसर्जन घाट, भादवड तलाव, नारपोली व अन्य तलाव अशा विसर्जन घाटांवर विसर्जन करीत श्रीं गणरायांना भावपूर्ण व श्रध्दाभक्तीपूर्ण निरोप देत गणेशोत्सव सण शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणांमध्ये संपन्न झाले.

यावेळी महानगरपालिकेच्या विविध विसर्जन घाटांवर शहरातील प्रभागसमितीनिहाय ७ दिवसांचे घरगुती, सार्वजनिक गणपती व गौरींचे विसर्जन करण्यांत आले. रात्री ९.४५ वाजेपर्यंत २१३३ गणपती व १४३ गौरींचे विसर्जन झाले.

घरगुती गणपती -१९७५
सार्वजनीक गणपती - १५
एकुण गणपती विसर्जन - २१३३
गौरी विसर्जन- १४३

भिवंडी महागरपालिकेने गणपती विसर्जन व्यवस्थित करण्यासाठी ठिकठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शहरातील विसर्जन घाटांवर विद्युत, मंडप व्यवस्था, श्रींच्या विसर्जनासाठी तराफे, जीवन रक्षक पथक नियुक्ती, अग्निशमन व मनपाच्या अधिकारी-कर्मचा-यांच्या नियुक्त्या करुन कोणतीही दुर्घटना होणार नाही याची विशेष दक्षता घेतली होती. वैद्यकिय आरोग्य विभागांचे वैद्यकिय अधिकारी कर्मचारी ॲम्बुलन्स्, औषधोपचार साधन-सामुग्रीसह उपस्थित होते.

## लाडकी बहीण योजना पडताळणीला लाभार्थ्यांनी प्रतिसाद द्यावा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेअंतर्गत ज्या लाभार्थ्यांनी अर्ज केलेला आहे अशा पैकी राज्य स्तरावर करण्यात आलेल्या छाननी मध्ये अपात्र आढळलेल्या लाभार्थ्यांचे पडताळणी करण्यासाठी संबधित लाभार्थ्यांचे लाभ देणे तात्पुरते थांबविण्यात आले आहे. लाभ थांबविण्यात आलेल्या लाभार्थ्यांमध्ये आधारकार्डप्रमाणे 21 वर्षे वयापेक्षा कमी व 65 वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या महिला लाभार्थ्यांचा समावेश आहे. तर रेशनकार्डनुसार ज्या कुटूंबात दोन पेक्षा जास्त महिलांना लाभ मिळत आहे अशा कुटूंबात महिलांचा समावेश आहे.

सबंधित लाभार्थ्यांचे या संदर्भात तसेच कुटूंबात 2 पेक्षा जास्त लाभ घेत असलेल्या लाभार्थ्यांची महिला व बालविकास विभागाकडून पडताळणी सुरु आहे. सदर पडताळणीनंतर जे लाभार्थी पात्र असतील त्यांचा मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेचा लाभ पुन्हा सुरु करण्यात येणार आहे. करिता ज्या लाभार्थ्यांचा मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेंतर्गत मिळणारा लाभतात्पुरता बंद झाला आहे, अशा महिला लाभार्थी यांनी आपल्या गावातील अंगणवाडी सेविका यांच्याशी सपंर्क करावा, असे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी रायगड श्रीकांत रुक्मिणी ज्ञानोबा हावळे यांनी केले आहे.

## विसर्जन मिरवणूक प्रसंगी भिवंडीत दगड भिरकवण्याची घटना

■ दोन जण किरकोळ जखमी ■ गुन्हा दाखल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडीत गेल्या वर्षी अनंत चतुर्थी दिवशी मध्यरात्रीच्या सुमारास वंजारपट्टी नाका परिसरात गणेश विसर्जन मिरवणुकीवर दगडफेक झाल्याने भिवंडी शहरात दोन समाजात मोठा तणाव निर्माण झाला होता.त्यावेळी पोलिसांनी सौम्य लाठीचार्ज करून जमावास पांगवून शांतता सुव्यवस्था कायम ठेवली,यंदा असा कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी भिवंडी पोलिसांनी विशेष पोलीस बंदोबस्त तैणात केला असतानाच मंगळवारी (दि.2 ) रोजी रात्री कल्याण रोड लकडा मार्केट रस्त्यावर गौरी व गणपती विसर्जन वेळी निघालेल्या मिरवणुकीत अज्ञात इसमाकडून दगड भिरकावण्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे.या घटनेमध्ये एका इसमासह महिला असे दोघेजण किरकोळ जखमी झाले आहेत. त्यामुळे पोलिसांनी गंभीर दखल घेऊन अज्ञात इसमाविरोधात शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.पोलिसांनी दिलेली माहितीनुसार शहरातील कल्याण रोड टेमघर पाडा परिसरातील इमारती मध्ये राहणारा मनोजकुमार संतोष कुमार जैस्वाल हे गणेश विसर्जन मिरवणुकीत सहभागी झाले होते.रात्री ९ वाजताच्या सुमारास विसर्जन मिरवणूक पाईपलाईल कल्याण रोड वरील लकडा मार्केट जवळ आली असता मिरवणुक चालु असतांना कोणीतरी अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवुन मनोज कुमार यांच्या दिशेने दगड फेकून मारला. त्या मध्ये दगड उजव्या बाजुच्या डोळयाच्या वर कपाळावर लागुन टेंगुळ येवुन जखम झाली तर एक दगड मिरवणुकीतील प्रियांशु सौरभ पांडे या महिलेस लागला.या प्रकरणी मनोजकुमार जैस्वाल यांनी दिलेल्या तक्रारीवरून भिवंडी शहर पोलिस ठाण्यात अज्ञात व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विशाल पवार करीत आहेत. यंदा खबरदारी उपाय म्हणून गणेशोत्सव पार्श्वभूमीवर ठिकठिकाणी कडेकोट पोलीस बंदोबस्त पोलीस प्रशासनाकडून ठेवण्यात आला आहे.

## सहा शिक्षकांना जिल्हा आदर्श शिक्षक गुणगौरव पुरस्कार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : शिक्षकदिनाच्या औचित्याने जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजित “जिल्हा आदर्श शिक्षक गुणगौरव पुरस्कार २०२५-२६” वितरण सोहळा ठाणे येथील बी. जे. हायस्कूल सभागृहात उत्साहात पार पडला. यावेळी एकूण सहा शिक्षकांना जिल्हास्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

“जिल्हा परिषद ठाणे शिक्षकांच्या प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. दिशा प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यातील निपुण महाराष्ट्र संकल्पना साकार होत असून, जिल्ह्यातील ३२ लाख विद्यार्थ्यांच्या चाचण्या घेण्यात आल्या आहेत. यामुळे विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती तपासता येते. शिक्षकांच्या बदली, पदोन्नती व विविध प्रश्न सोडविण्यासाठी देखील प्रशासन वचनबद्ध आहे. शाळांमध्ये भौतिक सुविधा,



सौर ऊर्जा, डिजिटल शिक्षण व दुरुस्ती यासाठी पुढाकार घेतला जात आहे. शिक्षकांना समृद्ध केल्याशिवाय विद्यार्थी सक्षम होणार नाहीत, त्यामुळे शिक्षकांचे योगदानच ठाणे जिल्ह्याच्या शैक्षणिक प्रगतीचे खरे बळ आहे.” असे मार्गदर्शन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले.

आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी पुरस्कारप्राप्त शिक्षकांचे अभिनंदन करताना म्हटले, “ग्रामीण भागातील शिक्षण, आरोग्य व कृषी क्षेत्राला तंत्रज्ञानाची जोड देत जिल्हा परिषदेचे कामकाज उत्तम सुरू आहे. आयुष्यभराच्या कर्तृत्वाचे फलित म्हणून आज शिक्षकांना हा सन्मान मिळत आहे, ही गौरवास्पद बाब आहे.”

आमदार निरंजन डावखरे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले, “शिक्षक हे खरे कर्मयोगी आहेत. विद्यार्थ्यांना ज्ञानाबरोबर संस्कार देण्याचे कार्य शिक्षक करतात, हे लाख मोलाचे आहे. जिल्हा परिषदेच्या पुढाकारामुळे शिक्षण क्षेत्र गतिमान झाले आहे आणि यामध्ये शिक्षकांचा वाटा अमूल्य आहे.”


प्रास्ताविक करताना बाळासाहेब राक्षे यांनी शिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणात शिक्षकांचे योगदान अधोरेखित केले.

पुरस्कारप्राप्त शिक्षिका वर्षा भानुशाली यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले, “विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षक म्हणून देश घडविण्यात आम्हाला सन्मानाने योगदान देता येत आहे. आजचा सन्मान म्हणजे शिक्षकांना मिळालेली कौतुकाची थाप आहे.”

यावेळी शिक्षणाधिकारी (योजना) भावना राजनोर, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) कुंदा पंडित, उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) भाऊसाहेब मोहिते, सर्व गटशिक्षणाधिकारी, अधिकारी-कर्मचारी व मोठ्या संख्येने शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गंगाराम ढमके यांनी केले तर विस्तार अधिकारी (शिक्षण) आशिष झुंजारराव यांनी आभार मानले.

**जिल्हा आदर्श शिक्षक गुणगौरव पुरस्कार प्राप्त शिक्षक**

सन २०२५-२६ वर्षातील जिल्हा आदर्श शिक्षक गुणगौरव पुरस्कार प्राप्त शिक्षक – अबंरनाथ तालुक्यातील शिक्षिका वर्षा भानुशाली , भिवंडी तालुक्यातील पदवीदर शिक्षिका पुष्पावती भोईर, कल्याण तालुक्यातील शिक्षक राजाराम वेखंडे, मुरबाड तालुक्यातील पदवीधर शिक्षक अविनाश सुरोशे व शिक्षक राजाराम गायकर, शहापूर तालुक्यातील शिक्षक नवनीत फर्डे इ .समावेश आहे.









**मेष**
कुठेतरी अडकलेले पैसे परत मिळतील. आज तुम्ही तुमच्या व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी काही नवीन योजना कराल, ज्याचा फायदाही होईल.

**वृषभ**
तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल. कुटुंबासाठी थोडा वेळ काढावा. आज तुम्ही काही कामात खूप व्यस्त असाल. सल्ला तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

**मिथुन**
तुम्हाला तुमच्या मुलांकडून काही चांगली बातमी मिळेल. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला जाणार आहे. प्रॉपर्टीशी संबंधित लोकांना फायदा होईल.

**कर्क**
योग्य दिशेने कठोर परिश्रम केल्यास विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरमध्ये यश मिळेल.व्यवसायात अपेक्षेपेक्षा जास्त फायदा होणार आहे .अधिकारी तुमच्यावर खुश राहतील.

**सिंह**
नातेवाईकाच्या आगमनामुळे कुटुंबात आनंदाचे वातावरण असेल. आपणही एकत्र कुठेतरी बाहेर जाऊ. आज तुमची आर्थिक स्थिती मजबूत होईल.

**कन्या**
व्यवसायानिमित्त प्रवास करावा लागेल.तुमच्या पालकांचा सल्ला तुमच्यासाठी उपयुक्त ठरेल. तुमच्या मुलाच्या यशाने तुम्ही आनंदी व्हाल.

**तूळ**
राशि फलादेश तुम्हाला अचानक आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. आज तुम्हाला ऑफिसमध्ये एक नवीन प्रोजेक्ट मिळेल, जो तुम्ही पूर्ण करण्यात यशस्वी व्हाल.

**वृश्चिक**
तुमच्या आवडीच्या ठिकाणी बदली होण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला जाणार आहे. तुमचे कार्यालयीन काम पूर्ण करण्यात सक्षम असाल.

**धनु**
नियोजित महत्त्वाची कामे वेळेत पूर्ण होतील. वैवाहिक जीवनात गोडवा राहील. एखादी चांगली बातमी मिळाल्याने तुमचे मन दिवसभर प्रसन्न राहील.

**मकर**
तुम्ही गंभीर बाबी शांततेनेसोडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आज तुम्ही थोडे भावूकही होऊ शकता. तसेच, घाईघाईने कोणताही निर्णय न घेणे चांगले.

**कुंभ**
कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील. तुम्हाला तुमच्या कामाच्या ठिकाणी लक्षणीय यश मिळेल.अभियंत्यांसाठी आजचा दिवस चांगला जाणार आहे.

**मीन**
आजचा दिवस खूप चांगला असेल. नोकरदार महिलांना चांगला दिवस जाईल.नवीन व्यवसायात सहभागी होण्याची संधी मिळेल.तुम्हाला उत्साही वाटेल.

नियमित वाचा दै. ठाणे जीवनदीप वार्ता

# शाश्वत विकासाची दूरदृष्टीपूर्ण लोकचळवळ ‘मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान’

**किरण वाघ**
**विभागीय संपर्क अधिकारी**

आपला भारत देश हा कृषिप्रधान आहे आणि गाव हे त्याचे प्राणकेंद्र आहे. त्यामुळे गावांचे प्रश्न सोडविल्याशिवाय आणि त्यांचा शाश्वत विकास साधल्याशिवाय देशाचा सर्वांगीण विकास शक्य नाही. शाश्वत विकास हा असा विकास आहे, जो सध्याच्या पिढीच्या गरजा भागविताना पुढील पिढ्यांसाठी साधन संपत्तीचे सातत्याने संवर्धन करत राहतो. म्हणूनच गावांचा शाश्वत विकास हा आपल्या राज्याच्या व राष्ट्राच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.

आज अनेक गावांमध्ये शिक्षण, आरोग्य, रोजगार, रस्ते, पिण्याचे पाणी, वीजपुरवठा या मूलभूत गरजांसह रोजगार, माहिती तंत्रज्ञान, शाळांमध्ये शिक्षणाचा उच्च दर्जा, शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी सर्वांगीण सुविधा, प्राथमिक आरोग्य केंद्रे तेथे औषधांची उपलब्धता, तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा अशा प्राथमिक चांगल्या सुविधा उपलब्ध करणे यासाठी शासन मोठ्या प्रमाणात काम करते.

या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने ग्रामीण विकासासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलत “मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान” सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. अभियानाचा शुभारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवशी १७ सप्टेंबर २०२५ रोजी होणार आहे. ही अंमलबजावणी केवळ स्पर्धात्मक राहणार नसून ग्रामविकास अभियानाला लोकचळवळीचे स्वरूप देणारी ठरेल.

हे अभियान राबविण्याची संकल्पना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आहे. २९ जुलै २०२५ रोजी राज्य मंत्रिमंडळाची यास मंजुरी मिळाली व अभियानाच्या अंमलबजावणीसाठी महत्वाचे पाऊल टाकले गेले. अभियान राबविण्यासाठी ₹ २९०.३३ कोटींची तरतूद करण्यात आली, त्यापैकी ₹ २४५.२० कोटी पुरस्कारांसाठी, तर उर्वरित निधी प्रचार, प्रशिक्षण आणि मार्गदर्शनासाठी वापरण्यात येणार आहे.

अभियानाचे उद्दिष्ट

या अभियानाचा मुख्य उद्देश गावागावात सुशासन प्रस्थापित करणे, ग्रामस्थांमध्ये आत्मनिर्भरता निर्माण करणे आणि विकासासाठी स्पर्धात्मक वातावरण तयार करणे आहे. योजना केवळ प्रशासकीय यंत्रणेपुरती मर्यादित नसून, ग्रामस्थांच्या थेट सहभागावर आधारलेली आहे.

ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामविकास विभाग शाश्वत विकास साधण्यासाठी ठिबक सिंचन, शेततळी, बंधारे, जलसंवर्धन, जलयुक्त शिवार यांसारख्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करत आहे. सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन, रासायनिक खतांचा वापर टाळण्यासाठी प्रयत्न, आवास योजनांतर्गत घरे, महिलांना बचतगटांच्या माध्यमातून सक्षम करणे, तसेच दुग्धोत्पादन, मधमाशीपालन, मत्स्यव्यवसाय आणि कुक्कुटपालन यांना चालना देऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यावर भर देण्यात येत आहे. या प्रयत्नांना अभियानातून प्रोत्साहन मिळणार आहे.

### अभियानाचे ७ प्रमुख घटक

१. सुशासनयुक्त पंचायत — पारदर्शक व लोकाभिमुख प्रशासन
२. सक्षम पंचायत — आर्थिक स्वावलंबन, कंपनी सामाजिक उत्तरदायित्व निधी (CSR) व लोकवर्गणी
३. जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव — पर्यावरण संरक्षण व पाणी व्यवस्थापन
४. योजनांचे अभिसरण — मनरेगा व इतर योजनांची प्रभावी अंमलबजावणी
५. संस्था सक्षमीकरण — शाळा, अंगणवाडी, आरोग्य केंद्रे यांची बळकटी
६. उपजीविका विकास व सामाजिक न्याय — रोजगार निर्मिती व महिला सक्षमीकरण
७. लोकसहभाग व श्रमदान — ग्रामस्थांचा प्रत्यक्ष

### सहभाग व श्रमदान

खरं तर सातवा घटक वैशिष्ट्यपूर्ण असून गावकऱ्यांचा थेट सहभाग व श्रमदान याचा अर्थ लोकसहभाग व श्रमदान यातून हे अभियान लोकचळवळ बनणे अपेक्षित आहे. अभियानाला प्रोत्साहन देण्याचे काम पुरस्काराच्या रूपाने होईल. पुरस्कारांसाठी एकूण २४५.२० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. एकूण १९०२ यशस्वी स्थानिक स्वराज्य संस्थांना पुरस्कार देण्यात येणार आहेत. या गावांच्या विकास कामांसाठी या ग्रामपंचायतींना मोठा निधी उपलब्ध होईल.

### पुरस्कार रचना :

राज्यात प्रथम विजेत्या ग्रामपंचायतीस ५ कोटी रुपयांचा राज्यस्तरीय पुरस्कार दिला जाईल. तर द्वितीय ३ कोटी रुपये, तृतीय २ कोटी रुपये पुरस्कार असेल .

### विभागस्तरीय पुरस्कार -

प्रत्येक विभागात ३ ग्रामपंचायतीना पुरस्कार. प्रथम रुपये १कोटी, द्वितीय रुपये ८० लाख, तृतीय रुपये ६० लाख

### जिल्हास्तरीय पुरस्कार -

प्रत्येक जिल्ह्यात ३ ग्रामपंचायतीना पुरस्कार. प्रथम रू ५० लाख, द्वितीय रू ३० लाख, तृतीय रुपये २० लाख

### तालुकास्तरीय पुरस्कार :-

प्रत्येक तालुक्यात ३ ग्रामपंचायतीना पुरस्कार प्रथम रुपये १५ लाख, द्वितीय रुपये १२ लाख, तृतीय रुपये ८ लाख
विशेष पुरस्कार : प्रत्येकी तालुक्यातील २ ग्रामपंचायतींना प्रत्येकी ५ लाख रुपये पुरस्कार आहे.
विभाग आणि राज्यस्तरावर पंचायत समित्यांसाठी आणि जिल्हा परिषदासाठी ही आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहे.
पंचायत समित्यांना ३ राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात येतील. प्रथम २ कोटी, द्वितीय १.५ कोटी, तृतीय १.२५ कोटी असे पुरस्कार आहे.

विभागस्तरीय पुरस्कारांमध्ये प्रथम १ कोटी, द्वितीय ७५ लाख, तृतीय ६० लाख रुपये असे आहे जिल्हा परिषदांना अभियानाच्या उत्कृष्ट अंमलबजावणीसाठी राज्यात ३ जिल्हा परिषदांना पुरस्कार आहेत यात प्रथम ५ कोटी, द्वितीय ३ कोटी, तृतीय २ कोटी असे पुरस्कार दिले जातील.
या अभियानाचा कालावधी १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ असा असून, एकूण १०० गुणांच्या निकषांवर मूल्यांकन केले जाईल. पारदर्शक प्रशासन, आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण, रोजगार, पर्यावरण, कर वसुली आणि लोकसहभाग यांचा विचार केला जाईल. प्रत्येक ग्रामपंचायतीने दररोजचा अहवाल विशेष मोबाईल ॲप्लिकेशन आणि वेबसाईटवर सादर करावा लागेल.

अभियानापूर्वी राज्यस्तरीय कार्यशाळा, जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय प्रशिक्षण, तसेच ग्रामसभांच्या माध्यमातून तयारी केली जाईल. व्यापक जनजागृतीसाठी कार्यशाळा, पोस्टर, बॅनर, सोशल मिडिया, यशोगाथा चित्रफीत आणि इतर साधनांचा उपयोग केला जाणार आहे.
राज्य आणि देशाच्या शाश्वत विकासासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण ही प्रगतीची पहिली पायरी आहे. सक्षम युवा पिढी घडवण्यासाठी गावांमध्ये डिजिटल वर्ग, ई-लर्निंग, पुस्तकालये, तसेच कौशल्याधारित प्रशिक्षण केंद्रे स्थापन करणे. यातून युवक युवतींना संगणक, मोबाईल रिपेअरिंग, इलेक्ट्रिक, शिवणकाम, कारागिरी अशा विविध व्यवसाय शिक्षणातून कौशल्य दिल्यास रोजगार निर्मिती व उद्योजकता वाढेल. अशा गावाच्या विकासावर परिणाम करणाऱ्या सर्व घटकांना चालना देण्यावर या निमित्ताने लक्ष दिले जात आहे.
“मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान” ही केवळ स्पर्धा नसून ग्रामीण महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाची दिशा आहे. प्रत्येक ग्रामस्थाने यात सहभाग घेतल्यास गावांचा चेहरामोहरा बदलून शाश्वत विकास साध्य होईल. हे अभियान खऱ्या अर्थाने लोकचळवळीचे दूरदृष्टीपूर्ण पाऊल ठरेल.

---

## लालबागचा राजा, जीएसबी मंडळांमध्ये

# फेस डिटेक्टर यंत्रणा कार्यान्वित

### भाविकांच्या अलोट गर्दीमुळे सुरक्षेच्या दृष्टीने अत्याधुनिक यंत्रणेचा वापर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : मुंबईतील प्रसिद्ध गणेश मंडळांच्या गणपतीचे दर्शन घेण्यासाठी लालबाग - परळ -गिरगावात भाविकांची प्रचंड गर्दी होत आहे. सुरक्षेच्या दृष्टीने लालबागचा राजा, जीएसबी मंडळांनी पुढाकार घेत फेस डिटेक्टर ही यंत्रणा कार्यान्वित केली आहे.

मुंबईतील प्रसिद्ध गणेश मंडळांच्या गणेशमूर्ती पाहण्यासाठी देशभरातून लाखो भाविक मुंबईत दाखल होतात. लालबागचा राजा, चिंचपोकळीचा चिंतामणी, मुंबईचा सम्राट, मुंबईचा राजा, राजा तेजुकायाच्या दर्शनासाठी प्रचंड गर्दी होत असते. या गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि सुरक्षेच्या दृष्टीने अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची मागणी काही वर्षांपासून केली जात आहे. सध्या लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ व जीएसबी सार्वजनिक गणेशोत्सव समितीने 'फेस डिटेक्टर' ही यंत्रणा कार्यान्वित केली आहे. अन्य मंडळांमध्ये मेटल डिटेक्टर व अन्य यंत्रणा लावण्यात आली आहेत.

### लहान मंडळांसाठी खर्च अधिक

फेस डिटेक्टर ही यंत्रणा प्रचंड महाग असल्याने छोट्या मंडळांना ते परवडत नाही. तसेच, यंत्रणा कुठून विकत घ्यायची, कशी हाताळायची, भाड्याने मिळते का याबाबतही मंडळांमध्ये अनभिज्ञता आहे. त्यामुळे या यंत्रणेचा फारसा विचार केला जात नाही, असे परळ विभाग सार्वजनिक ट्रस्टचे विश्वस्त मिनार नाटळकर यांनी सांगितले. आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या मंडळांना ही यंत्रणा बसविणे अवघड नाही. मंडळात भाडेतत्त्वावर मेटल डिटेक्टर यंत्र आणण्यात आले होते. मात्र, दोन - तीन दिवसांपूर्वी त्यात बिघाड झाल्याने ते पुन्हा पाठवले, अशी माहिती खेतवाडीतील मुंबईचा सम्राट ६ वी गल्लीचे किरण शिंदे यांनी दिली. सुरक्षेच्या दृष्टीने मंडळात ५४ सीसीटिव्ही कॅमेरे, ८ मेटल डिटेक्टर बसविण्यात आले आहेत. मात्र, फेस डिटेक्टर यंत्रणा उभारण्यात आलेली नाही, असे मुंबईचा राजा मंडळातर्फे सांगण्यात आले.

---

# भिवंडीत राष्ट्रीय ओबीसी महासंघाची निदर्शने

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे यांनी मुंबई येथे समाजाच्या आरक्षणासाठी आंदोलन करून आपल्या मागण्या मान्य करून घेतल्याने महाराष्ट्र राज्यातील ओबीसी समाजात प्रचंड असंतोष पसरला आहे.मराठा समाजाला सरसकट ओबीसी प्रवर्गातून जात प्रमाणपत्र देण्यास ओबीसी समाजाकडून विरोध केला जात आहे.त्यासाठी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचेवतीने राज्य शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी ठिकठिकाणी आंदोलन केली जात आहेत.भिवंडीत सुध्दा



ओबीसी महासंघाचे माध्यमातून भिवंडी उपविभागीय अधिकारी कार्यालया समोर आज निदर्शने करीत घोषणाबाजी करीत आंदोलन करण्यात आले.

ओबीसी संघटनेचे तालुकाध्यक्ष भगवान ठाकूर,माजी आमदार रुपेश म्हात्रे, शिवसेना उपनेते विश्वास थळे, सोन्या पाटील, विराज चोरघे, विनोद पाटील, दिलीप नाईक, मनोज गगे, मनोहर तरे यांच्यासह मोठ्या संख्येने ओबीसी समाजबांधव महिला सहभागी झाले होते.

मराठा समाजाचा ओबीसी प्रवर्गात समावेश करण्यात येऊ नये.ओबीसी मुलांना व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी शंभर टक्के शिष्यवृत्ती देण्यात यावी. ओबीसी गुणवंत विद्यार्थ्यांना परदेशी शिक्षणासाठी ची संख्या ७५ वरून २०० करावी. महज्योती या संस्थेकरीता एक हजार कोटींची तरतूद राज्य शासनाने करावी, अतिवृष्टी मुळे पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना त्वरित नुकसान भरपाई द्यावी.म्हाडा व सिडको तर्फे बांधण्यात येणाऱ्या घरकुल योजनेत ओबीसी प्रवर्गासाठी आरक्षण ठेवण्यात यावे आदि व इतर मागण्यांचे निवेदन उपविभागीय अधिकारी कार्यालयात उपस्थित भिवंडी तहसीलदार अभिजित खोले यांना सुपूर्द करण्यात आले.यावेळी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

---

# मुरबाडमध्ये ओबीसी समाजाचे साखळी उपोषण





## सरकारने काढलेल्या अध्यादेशाचा निषेध!

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : महाराष्ट्र सरकारने मनोज जरांगे याच्या मुंबई येथील उपोषणाची दखल घेऊन ओबीसींवर अन्याय करणारा अध्यादेश (हैद्राबाद गॅझेट) च्या शिफारसी येत्या दोन महिन्यात मान्य करू असे आश्वासन दिले आहे.हाअध्यादेश ओबीसी समाजावर अन्याय करणारा आहेच तसेच सातारा गॅझेट सुद्धा अन्याय कारक असून सकळ ओबीसी समाजामध्ये सरकार विरोधात संताप व्यक्त होताना दिसत आहे.सरकार ओबीसींची फसवणूक करत असून सरकारने काढलेल्या या जि.आर.विरोधात व ईतर काही मागण्यांसाठी आज मुरबाड तालुक्यातील सर्व कुणबी, आग्रि, नाभिक,शिंपी, सोनार, कुंभार,तेलि व ईतर अशा ओबीसी समाजातील समाज बांधवांनी एक दिवसीय साखळी उपोषण करत सरकारचा निषेध केला. यावेळी आंदोलकांच्या वतीने जोरदार घोषणाबाजी करत निषेध व्यक्त केला.यावेळि ओबीसी समाजाच्या वतीने काही प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. यापैकी जातनिहाय जनगणना करणे,मराठ्यांना सरसकट कुणबी दाखले ओबीसी प्रवर्गातून देऊ नये,मराठा समाजाचे ओबीसीकरण करू नये ,ज्ञानज्योति फूले आधार योजना सुरु करणे, ठाणे जिल्ह्यात ओबीसी विद्यार्थी वसतिगृह सुरु करणे आदि मागण्या यावेळी सरकारकडे करण्यात आल्या आहेत.


यावेळी ओबीसी समाजाच्या वतीने सरकारने मराठ्यांसाठी काढलेल्या अध्यादेश (जि.आर.) फाडण्यात येऊन निषेध केला व मागण्यांचे निवेदन मुरबाड तहसीलदारांना देण्यात आले. सदर निवेदन लवकरच शासन दरबारी पाठवले जाणार असल्याचे यावेळी प्रशासनाच्या वतीने सांगण्यात आले.या उपोषणाला मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे, जिल्हा परिषदेचे मा.उपाध्यक्ष सुभाष पवार यांच्या सह मोठ्या संख्येने ओबीसी बांधव उपस्थित राहून पाठिंबा दिला.

---

# भांडुपमध्ये रस्त्याची दुर्दशा!

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : गेल्या अनेक वर्षांपासून भांडूप गाव पुर्व महादेव दामोदर केणी मार्ग ते शिवाई शाळा ,महापालिका शाळेच्या (मध्यभागी ) येथे पेवर ब्लॉक टाकण्यात आले आहेत. पण ते आता ओबडधोबड व बरेच निघाले आहेत त्यामुळे रस्त्या खड्डेमय झाला असून पाणी साचून राहते वाहने व जनतेला या त्रासाला सामोरे जावे लागत आहे चिखलमय रस्त्यावर वाहनाची कोंडी होणे नित्याचेच झाले आहे तरी सणासुदीच्या दिवसात ही जनतेला या समस्येस सामोरे जाव लागत आहे. याबाबत भांडूप एस विभागात



सामाजिक कार्यकर्ता नरेंद्र पवार यांनी अनेक वेळा ट्युट करून तक्रार दाखल केली. आहे तरीपण तक्रारीची दखल घेऊन त्वरित व योग्य असा मार्ग काढून भांडूपकर जनतेला दिलासा द्यावा.

---

# डोंबिवलीमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाने खड्डयांची दुरुस्ती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली पालिकेच्या निधीचा वापर न करता डोंबिवलीतील मोठागाव रेतीबंदर भागातील खड्डे, रस्ते मास्टिक अस्फाल्ट तंत्रज्ञानाने भरून देण्याचे काम समर्पित जलदगती मालवाहू रेल्वे मार्गाची ठेकेदार कंपनी टाटा प्रोजेक्टसने करून दिले आहे. ही कामे करून घेण्यासाठी ठाकरे गटाचे डोंबिवली जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांनी विशेष प्रयत्न केले.

डोंबिवली पश्चिमेतील मोठागाव रेतीबंदर परिसरात दिल्ली ते जेएनपीटी समर्पित जलदगती मालवाहू रेल्वे मार्गाचे काम मागील दोन ते तीन वर्षापासून डोंबिवलीतील मोठागाव, रेतीबंदर, देवीचापाडा, कोपर भागात सुरू आहेत. या भागात रेल्वे मार्गाची बांधणी



करण्यासाठी लागणारे रेल्वे ठेकेदाराचे सामान माती, सीमेंट, अवजड तुळ्या, इतर मालवाह वाहने या शहरी रस्त्यावरून धावत आहेत. या अवजड मालवाहू वाहनांमुळे मोठागाव रेतीबंदर रस्त्याची सर्वाधिक दुरवस्था झाली आहे. यापूर्वी या भागातील रस्ते कधीच खड्डे पडून खराब झाले नव्हते. या खड्ड्यांचा कल्याण, डोंबिवली परिसरातून धावणाऱ्या प्रवाशांना सर्वाधिक होत आहे, असा जिल्हाप्रमुख म्हात्रे यांचा प्रश्न होता. या रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठी पालिका प्रशासनाला गळ घालण्याची मागणी काही मंडळांनी जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांच्याकडे केली होती. परंतु, हे खड्डे समर्पित जलदगती मालवाहू रेल्वे मार्गिकच्या कामासाठी धावणाऱ्या अवजड वाहनांमुळे पडले आहेत. त्यामुळे पालिकेपेक्षा मोठागाव रेतीबंदर भागातील खड्डे भरणी, रस्ते सुस्थितीत करण्याची कामे समर्पित जलदगती रेल्वे मार्ग बांधणाऱ्या टाटा प्रोजेक्टस कंपनीने करून देण्याची मागणी रेल्वे ठेकेदाराकडे म्हात्रे यांनी केली होती. ही कामे अनंत चतुर्थीच्या आत पूर्ण करून द्यावीत, अशीही मागणी केली होती. ही कामे वेळेत पूर्ण केली नाहीत तर या भागातील समर्पित जलदगती रेल्वेचे काम बंद पाडले जाईल असा इशारा जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांनी रेल्वे ठेकेदाराला दिला होता.

ठेकेदार रस्ते सुस्थितीत करून देत नाही लक्षात आल्यावर म्हात्रे यांनी मोठागाव भागातील समर्पित जलदगती रेल्वेचे काम बंद पाडले. रस्ते सुस्थितीत करा मग काम सुरू करा, अशी तंबी म्हात्रे यांनी ठेकेदार कंपनीला दिली. त्यानंतर रेल्वेचे ठेकेदार यांनी दीपेश म्हात्रे यांची भेट घेतली. मास्टिक अस्फाल्ट तंत्रज्ञानाने खड्डे भरून देण्याचे आश्वासन दिले. त्याप्रमाणे रेल्वे ठेकेदार कंपनीने बुधवारी रात्रीपासून मोठागाव, रेतीबंदर भागातील खड्डे पडलेले रस्ते सुस्थितीत करून देण्याचे काम पूर्ण केले आहे. अशाच पध्दतीने देवीचापाडा गावदेवी मंदिर भागातील रस्ता सुस्थितीत करून देण्याची गणेशभक्तांची मागणी आहे. या रस्त्याचा रेल्वेच्या ठेकेदाराने वापर केला आहे, असे गणेशभक्त सांगतात.
मोठागावमधील रस्ते कामे अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुस्थितीत केल्याने प्रवाशांबरोबर गणेशभक्तांना समाधानाने या रस्त्यावरून प्रवास करता येईल, असे जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांनी सांगितले.



# कल्याण येथे संविधान जनजागृती प्रशिक्षण शिबीर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण येथील ग्लोबल व्हिजन चर्च येथे विशाल दामले यांच्या अध्यक्षतेखाली संविधान जनजागृती प्रशिक्षण शिबिर संपन्न झाले. या शिबिरात महाराष्ट्रातील विविध भागांतून आलेले सुमारे 150 हून अधिक देवाचे सेवक सहभागी झाले. या प्रसंगी संविधान अभ्यासक नूरखाँ पठाण (महाड) यांनी संविधान विषयावर सखोल मार्गदर्शन केले.

दुसऱ्या सत्रात संस्थेचे अध्यक्ष विशाल दामले यांनी संविधान जागृतीचे महत्व स्पष्ट केले तसेच अशा प्रकारचे उपक्रम नियमित राबविण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मराठी ख्रिस्ती सामाजिक संस्था पास्टर आशिष मोरे (व्यवस्था), प्रवीण गुंजाळ (सूत्रसंचालन), मोनिका दामले व महिला अध्यक्ष राजेश्री भालेराव, संदीप कांबळे व त्यांची टीम यांचे विशेष योगदान राहिले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन दिनेश वाघचौरे (उपाध्यक्ष) यांनी केले.



# सर्व पक्षीय हक्क संरक्षण संघर्ष समितीची केडीएमसी प्रभागरचनेवर हरकत



## महानगरपालिकेतून २७ गावे वगळण्याची मागणी कायम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या वतीने आगामी निवडणुकीसाठी प्रारूप प्रभाग रचना आराखडा प्रसिद्ध करण्यात आला असून आज या प्रभाग रचनेवर हरकत घेण्याच्या शेवटच्या दिवशी सर्व पक्षीय हक्क संरक्षण संघर्ष समितीने केडीएमसी प्रभागरचनेवर हरकत घेत महानगरपालिकेतून २७ गावे वगळण्याची मागणी कायम ठेवली आहे. याबाबत सुमारे साडेतीन हजार हरकती नोंदविण्यात आल्या. सर्व पक्षीय हक्क संरक्षण संघर्ष समितीचे अध्यक्ष खासदार सुरेश म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली उपाध्यक्ष सत्यवान म्हात्रे, रतन पाटील, दत्ता वझे, चिटणीस मधुकर माळी, उपाध्यक्ष विश्वास भोईर, प्रल्हाद गायकर, तुळशीराम म्हात्रे, रामचंद्र पाटील, दीपक काळण, परेश म्हात्रे, सनी पाटील, मुरलीधर म्हात्रे, विनोद भोईर, संजू जोशी आदींसह २७ गावांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सर्व पक्षीय हक्क संरक्षण संघर्ष समिती (रजि.) ही वेळोवेळी २७ गावातील जनतेचे समस्या तसेच कल्याण डोंबिवली महानगरपालिकेपासून वेगळे होऊन नगरपालिका स्थापन करण्याच्या उद्दिष्टाने गेली ४२ वर्षे कार्यरत आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेमध्ये सामील होण्यास समितीचा पूर्णपणे विरोध आहे. तसेच या प्रकरणी शासन तसेच महानगरपालिकेने या पूर्वी सकारात्मकता दर्शावत २०१५ ला संपूर्ण २७ गावे तसेच २०२० ला २७पैकी १८ गावे वगळण्याच्या विचाराधीन होते व तशी अधिसूचनाच प्रसिद्ध करण्यात अली. परंतु काही तांत्रिक कारणास्तव त्यास उच्च न्यायालयामार्फत स्थगिती देण्यात आली. परंतु त्या विरोधात शासन, कल्याण डोंबिवली महानगरपालिका तसेच आता सर्व पक्षीय हक्क संरक्षण संघर्ष समितीने सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

२७ गावांमध्ये प्रभाग रचनेस समितीने आधीच विरोध दर्शवला होता. तसेच ही बाब निवडणूक आयोग यांच्या निदर्शनास आणून देऊ असे केडीएमसी आयुक्तांनी आश्वासित केले होते. परंतु तसे केले नसल्याचे प्रदर्शित प्रारूप प्रभाग रचनेवरून आढळून येते. त्याविरोधात २७ गावांमध्ये प्रभाग रचना तर केलीच परंतु न्यायप्रविष्ट असलेले २७ गावातील क्षेत्रांची स्वतंत्र प्रभागाची आखणी करणे अपेक्षित असताना ते केले नाही. जेणे करून हे क्षेत्र वगळता त्याचे परिणाम हे महापालिकेमध्ये इतर क्षेत्रावर होऊ नयेत. संघर्ष समितीच्या मागणीस पाठिंबा देत या प्रभागरचनेविरोधात २७ गावतील जनतेने हजारोंच्या संखेने आपल्या हरकती नोंदवलेल्या आहेत. तरी २७ गावातील जनतेचे प्रतिनिधी म्हणून समितीचे म्हणणे गांभीर्याने घ्यावे व संबंधित सुनावणी मधे आम्हास ऐकून घ्यावे अशी मागणी सर्व पक्षीय हक्क संरक्षण संघर्ष समितीने केडीएमसी आयुक्तांकडे केली आहे.

# गणपती बाप्पाचा जाहिरातीसाठी विडंबनात्मक वापर

## बिनशर्त माफी मागा अन्यथा कायदेशीर कारवाईला सामोरे जा
## हवेल्स व न्यूट्रिका कंपन्यांना हिंदु जनजागृती समितीच्या वतीने नोटीस

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर हवेल्स इंडिया लिमिटेड आणि न्यूट्रिका (बीएन होल्डिंग्स लिमिटेड) या दोन कंपन्यांनी त्यांच्या जाहिरातींमध्ये भगवान श्रीगणेशाचे विडंबनात्मक आणि अपमानास्पद चित्रण करून हिंदूंच्या धार्मिक भावना दुखावल्या आहेत. या प्रकारामुळे निर्माण झालेल्या तीव्र संतापाच्या पार्श्वभूमीवर हिंदु जनजागृती समितीच्या वतीने कायदेशीर नोटीस बजावण्यात आली असून, त्वरित जाहिरात मागे घेऊन बिनशर्त माफीची मागणी करण्यात आली आहे. अन्यथा संबंधित कंपन्यांविरोधात गंभीर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा समितीच्या वतीने देण्यात आला आहे.







मुंबईतील प्रभादेवी येथील सेंच्युरी बाजार चौकात हवेल्स कंपनीने लावलेल्या डिजिटल जाहिरातीत भगवान श्रीगणेशाचे शरीर विजेच्या उपकरणांनी बनवलेले दाखवले, तर न्यूट्रिका कंपनीने त्यांच्या खाद्यतेलाच्या कॅनला हात, पाय आणि मुकुट लावून श्रीगणेशाच्या रूपात मांडले. या दोन्ही जाहिरातींमुळे श्रीगणेशाच्या पावित्र्याचा अवमान झाला असून "क्रिएटिव्ह जाहिरात" या नावाखाली श्रद्धेचा उपहास करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. समितीच्या श्री. रविंद्र दासारी आणि श्रीमती स्वाती पांडे यांच्या वतीने अधिवक्ता प्रसाद संकपाळ, अधिवक्ता प्रथमेश गायकवाड व अधिवक्ता सुरभि सावंत यांनी संबंधित कंपन्यांना नोटीस पाठवली आहे.

या प्रकारामुळे केवळ धार्मिक भावना दुखावल्या नसून, भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १५३(अ), १९६, २९९, ३००, ३०२, तसेच भारतीय दंड संहिता (IPC) कलम २९५, २९५(अ), २९८, ग्राहक संरक्षण कायदा २०१९, IT कायदा २०२१, ASCI चा आचारसंहिता, आणि संविधानातील अनुच्छेद २५ व २६ यांचे उल्लंघन झाले आहे. अशा जाहिरातींमुळे समाजात धार्मिक तणाव निर्माण होण्याचा धोका असून, परंपरागत मूर्तीकार, धार्मिक कार्यकर्ते व कोट्यवधी भाविकांच्या श्रद्धेवर घाला घालणारा प्रकार आहे.

हिंदु जनजागृती समिती व तक्रारदारांनी या नोटीसीत मागणी केली आहे की, संबंधित जाहिराती त्वरित मागे घ्याव्यात, सर्वत्र बिनशर्त माफी मागावी, भविष्यात देवतांच्या अशा वापरास प्रतिबंध करणारी लेखी हमी द्यावी आणि मानसिक त्रास व धार्मिक अवमानाच्या भरपाई म्हणून ५० लाखांची रक्कम पाली अष्टविनायक मंदिरास देणगी स्वरूपात अर्पण करावी. या मागण्या मान्य न झाल्यास समिती कायदेशीर मार्गाने लढा देणार आहे.

# सरस्वती विद्यालयात शिक्षक दिन साजरा

## गुरुवंदना, पुष्पगुच्छ आणि सत्काराद्वारे दिला शिक्षकांचा आदर




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ओतूर : उदापूर येथील सरस्वती विद्यालयात ५ सप्टेंबरच्या शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनीच शिक्षकांची भूमिका पार पाडून हा दिवस अनोख्या पद्धतीने साजरा केला. या अनोख्या उपक्रमामुळे शिक्षक दिनाचे औचित्य अधिकच भावनिक आणि संस्मरणीय बनले, अशी माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका कु. स्नेहल शिंदे यांनी दिली.

भारताचे माजी राष्ट्रपती आणि महान शिक्षक डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस म्हणून दरवर्षी ५ सप्टेंबर शिक्षक दिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त सरस्वती विद्यालयात 'स्वयंशासन दिन' आयोजित केला गेला. प्रार्थनेच्या वेळी विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका बजावून गुरुवंदना सादर केली. तसेच, डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून शिक्षकांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

विद्यार्थ्यांनी शिक्षकांप्रमाणे वर्तन करत शालेय जीवनातील जबाबदाऱ्या पार पाडल्या. इयत्ता दहावीतील विद्यार्थी-विद्यार्थिनी पूर्वा अमूप, राणी शिंदे, स्वामिनी शिंदे, संस्कृती बटवाल, श्रावणी चौधरी, श्रावणी शिरसाट, श्रेया कुलवडे, आर्या आंबडेकर, अशिता महाकाळ, विघ्नेश शिंदे आणि श्रेयश शिरसाट यांनी शिक्षक म्हणून भूमिका निभावली. तर शिक्षक प्रतिनिधी म्हणून वेदांत भोर, सेवक म्हणून अथर्व शिंदे व अवधूत शिरसाट यांनी कार्य पाहिले. यावेळी मुख्याध्यापिका स्नेहल शिंदे यांनी संपूर्ण शालेय प्रशासनाचे नियोजन केले व कार्यक्रम यशस्वी करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

दुपारच्या वेळी सह- विचार सभेचे आयोजन करण्यात आले, जिथे विद्यार्थी व शिक्षक एकत्र बसून अनुभव शेअर केले. विद्यार्थ्यांनी शिक्षकांबद्दल आपली कृतज्ञता व्यक्त केली आणि शिक्षण क्षेत्रातील योगदानाबद्दल आदर व्यक्त केला.

स्वयंशासन दिनाचे नियोजन विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक साईनाथ भोर, प्रमोदकुमार जाधव व योगेश गाढवे यांनी केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम अत्यंत सुरेख रीतीने पार पडला. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाचे महत्त्व समजले तसेच शिक्षकांचे योगदान यथोचितपणे ओळखले गेले.

सरस्वती विद्यालयाच्या या अनोख्या उपक्रमामुळे शिक्षक दिन साजरा करण्याची पद्धत विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण करणारी ठरली आणि शालेय जीवनातील शिक्षण प्रेम व आदर याची एक जिवंत उदाहरण ठरली.

# हेटवणे धरण जलबोगदा स्थानिकांची चिंता वाढवणारी- सी.आर.म्हात्रे

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : शहरी व औद्योगिक विकासाठी प्रकल्प अशी या हेटवणे धरणाची नव्याने ओळख सुरू झाली आहे.

रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील या मोठ्या धरणाची निर्मिती ही खारेपाट विभागात सिंचन,आणि पिण्याचे २४ तास पाणी मिळेल यासाठी झाली आहे. मात्र आत्ता जलबोगदा तयार करून शहरासाठी,औद्योगिक विकाससाठी या पाण्याचा उपयोग करण्याचे प्रयत्न सुरू झालेत. वास्तविक हे पाणी पळविण्याचे धोरण राबवित असताना स्थानिक ग्रामपंचायत ते आमदार खासदार या सर्वोच्च लोकप्रतिनिधी यांना विश्वासात घेतले असावे,मात्र जनतेची काळजी असणारे लोकप्रतिनिधी याला संमती देणार कसे,पण तरीही असे धोकादायक काम होत आहे ही बाब चिंताजनक असल्याचे वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी आर म्हात्रे यांनी सांगितले.

देशपातळीवर मोजके नेते जनतेचे दिसतात,हे राजकीय चित्र दिसते. साधी राहणी उच्च विचार असणारे कल्याणकारी नेते जनतेचा आत्मा असतो,ते असायला पाहिजे. बोगद्याच्या कामामुळे लगतच्या डोंगराना तडे जाण्याचा धोका निर्माण होणार आहे.भूस्खलन होताना दिसेल, भू गर्भातील पाण्याचं प्रवाह बदलेल, असे अभ्यासक म्हणतात,उत्तर प्रदेशातील जी हानी आपणास दिसते ती याचेच द्योतक आहे.


एवढे मोठे हेटवणे धरण असूनही धरण उशाला कोरड घशाला अशी वाशी खारेपाटासह खेड्यातील जनता दोन तीन दिवस पाण्याची वाट पाहत आहे.२४ तास पाण्याचे स्वप्न पूर्ण झाले नाही,सिंचनासाठीचे ७६६ कोटींचे कार्यारंभ होत नाही. पुढे जाऊन दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण होईल,अगोदरच JSW



मुळे जगाच्या कानाकोपऱ्यात पेण तालुक्याला प्रसिद्धी मिळाली आहे,इतर राज्यातून हद्दपार झालेले कारखाने जल वाहतुकीमुळे तालुक्यात येत आहेत.पेण तालुका भाताचे कोठार राहील का हीअशी शंकाही व्यक्त केली आहे.

याबाबत जन सुनावणी न घेता बोगद्याचे काम सुरू आहे हे चित्र धोकादायक आहे येथे साधी भोळी माणसे राहतात, आमचे हक्काचे पाणी पळवून नेऊ पाहतात,प्रशासन शहरी लोकांची काळजी घेते आम्हाला मात्र आठवड्यातून दोनदा, तीनदा पाणी येते हे योग्य नाही.जर बोगद्यातून पाणी गेले की आठवड्यातून एकदा पाणी अशी अवस्था होईल. पर्यावरण प्रेमी संघटनांनी या होणाऱ्या पर्यावरणीय परिणामांचे मूल्यांकन(EIA) करूनच पुढील कामाची सुरुवात करावी अशी सूचना दिली आहे.शिवाय विस्थापिताना योग्य मोबदला ,पुनर्वसन ,संभाव्य धोके याची कल्पना दिली गेली का हा प्रश्न आहे. मात्र तशे चित्र दिसून येत नाही.थोडक्यात काय तर शहरी जनतेची काळजी घेऊन ग्रामीण जनतेला पायदळी तुडवून जाण्याची ही परिस्थिती आहे. ग्रामीण जनता रस्ते ,पाणी ,वीज ,बंदिस्ती काविळ सदृश्य आजार ,कॅन्सर आजाराने त्रस्त ,दररोज लहान ,तरुण यांना श्रद्धांजली वाहत आहेत हे चित्र खेद जनक आहे .पुढे भविष्यात विस्थापित होण्याचे संकट दिसते. कटू पण सत्य असून सर्वच अवघड आहे असेही सामाजिक कार्यकर्ते सी आर म्हात्रे यांनी सांगितले.

# पडघ्यात गौरी गणपती विसर्जनासाठी चारचाकी वाहनांना नागरीकांकडून पसंती



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पडघा : वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथे गौरी गणपती विसर्जनासाठी नागरीकांकडुन चारचाकी वाहनांना पसंती देण्यात आली.

सात दिवस वास्तव्य असलेल्या गौरीसह गणपंतीचे तालुक्यातील पडघा येथील ओहळ आणी कुंभेरी नदीवरील गणेश घाटावर वाजत गाजत, टाळ मृदूंगाच्या गजरात मोठ्या भक्तीभावाने साश्रु नयनांनी विसर्जन करण्यात आले. पुर्वी डोक्यावर त्यानंतर सजविलेल्या हातगाडीमधुन गणेश मुर्ती गणेश घाटावर नेऊन विसर्जन केले जात होते मात्र या पारंपारिक पध्दतीला नागरीकांनी तिंलाजली देत बहुतांश नागरीकांनी यावेळी सजविलेल्या टेम्पो, रिक्षा, ट्रॅक्टर व स्वताच्या खाजगी चारचाकी वाहनांना पसंती देऊन गौरी गणपंतीचे विसर्जन केले. त्यामुळे भविष्यात डोक्यावर कींवा हातगाडीमधुन गणपती नेऊन विसर्जन करण्याच्या पद्धतीला तिलांजली मिळणार आहे.

# शिवसेनेच्या वतीने स्वच्छतेसाठी कचऱ्याचे डब्बे वाटप

## शिवसेना उपशहर प्रमुख मोहन उगले यांचा उपक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : माजी नगरसेवक तथा शिवसेना उपशहर प्रमुख मोहन उगले यांच्या संकल्पनेनुसार शिवसेना ठाणकर पाडा विभागीय शाखेच्या वतीने प्रभागातील विविध गृहसंकुलांना स्वच्छतेच्या दृष्टीने कचऱ्याचे डबे वाटप करण्यात आले. या डब्यांमुळे कचऱ्याचे ओला आणि सुका कचरा असे वर्गीकरण करण्यास मदत होईल. त्याप्रसंगी शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख अरविंद मोरे, महिला शहर प्रमुख नेत्रा उगले, शिवसेना युवा सेना सचिव वैभव भोईर, उपशहर प्रमुख मोहन उगले, विभाग प्रमुख अनंत पगार, शाखाप्रमुख शरद आव्हाड, नितीन कदम, उपशाखाप्रमुख संदीप पगारे, उमेश भुजबळ, पिंटू दुबे, महिला आघाडी विजय सिंग आदी पदाधिकारी उपस्थित होते. पॅनल क्रमांक ७ प्रभागातील उर्वरित राहिलेल्या साई विहार, निळकंठ व्हॅली, नीलकंठ धारा, सागर हेरिटेज, देवी विहार, श्रीकांत सदन या सोसायट्यांना व गणेश बेतुरकर यांना सुका कचरा व ओला कचरा वर्गीकरणाचे डबे वाटप करण्यात आले. यावेळी जिल्हाप्रमुख अरविंद मोरे यांनी विभागातील सर्व नागरिकांना मार्गदर्शन केले. कचऱ्याचे ओला कचरा सुका कचरा असे वर्गीकरण केल्यास प्रभागात स्वच्छता राखण्यास मदत होणार असल्याचे मोहन उगले यांनी सांगितले. प्रदीप मोरे यांनी सर्वांचे आभार मानले.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# कल्याण उप प्रादेशिक परिवहन कार्यालयांतर्गत येणाऱ्या शिबीर (कॅम्प) कार्यालयात वाढ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील शिबीर कार्यालय 1. अंबरनाथ, 2. बदलापूर व 3. मुरबाड अशी एकूण तीन शिबीर कार्यालये येत असून या कार्यालयात शिकाऊ अनुज्ञप्ती (Learner License) व पक्के अनुज्ञप्ती (Driving License) विषयक कामकाज केले जाते.

शिबीर कार्यालयात शिकाऊ अनुज्ञप्ती (Learner License) व पक्के अनुज्ञप्ती (Driving License) बाबत अपॉईन्टमेंट मिळत नसल्याने जनतेची गैरसोय होते व लोकसंख्येतील वाढ लक्षात घेता शिबीर कार्यालये कमी पडत असून शिबीर कार्यालयात वाढ करणे आवश्यक असल्याने शिबीर कार्यालयात वाढ करण्यात आली आहे.

शिबीर कार्यालयाचे नियोजन पुढीलप्रमाणे:-

शिबीर कार्यालय क्र.1 - शिबीर कार्यालयाचे ठिकाण- अंबरनाथ, कामकाजाचे दिवस- दर महिन्याच्या प्रत्येक मंगळवार व शुक्रवारी.

शिबीर कार्यालय क्र.2 - शिबीर कार्यालयाचे ठिकाण- बदलापूर, कामकाजाचे दिवस- दर महिन्याच्या प्रत्येक सोमवार व गुरुवारी.

शिबीर कार्यालय क्र.3 - शिबीर कार्यालयाचे ठिकाण- मुरबाड, कामकाजाचे दिवस- दर महिन्याच्या प्रत्येक बुधवारी.

जनतेचे हिताकरिता शिबीर कार्यालयात वाढ करण्यात आल्याचे कल्याण उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल यांनी कळविले आहे.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024